नि.फौ.ख.क्र.४६/२०२१

सरकार -वि- निलेश **नि.क्र. २४**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — राजन ग्यानीराम पडारे

वय. ४५ वर्षे, व्यवसाय — नोकरी,

निवासस्थान – सागर नगर, केसलवाडा रोड, भंडारा, ता. व जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील यांच्यामार्फत.</u>**

मी जिल्हा परिषद भंडारा येथे कनिष्ठ प्रशासन अधिकारी या पदावर कार्यरत आहे. माझे घरी मी व माझ्या दोन मुली असे राहतो. माझे घर श्रीराम नगर, तुमसर येथे आहे. घटना दिनांक २२.०३.२०२१ रोजी अंदाजे सायंकाळी ७.०० वाजता श्रीराम नगर, तुमसर येथील माझ्या राहत्या घरात घडली होती. त्यावेळी मी पंचायत समिती, भंडारा येथे कार्यरत होतो. माझ्या दोन्ही मुली श्रीराम नगर, तुमसर येथे राहत होत्या. मी भंडारा येथे येणे जाणे करत होतो.

२. दिनांक २२.०३.२०२१ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता मी श्रीराम नगर, तुमसर येथील घरी हजर असतांना आरोपी क्र. १ निलेश बालचंद अहिरे, वय अंदाजे ३५ वर्ष, राहणार दावेझरी (आंबागड) हा आपल्या मित्रासह माझ्या घरी आला. मला त्याने शिवीगाळ केली. सदर घटने अगोदर आरोपी निलेश याने माझे पत्नीसोबत तिचे खांद्यावर हात टाकुन फोटो काढुन तो फेसबुकला अपलोड केला होता. माझी पत्नी मला व माझे दोन मुलींना सोडुन तिच्या माहेरी राहत आहे. त्यावेळी आमचा घटस्फोट झाला नव्हता त्यामुळे मी आरोपी निलेश यास माझ्या पत्नीच्या खांद्यावर हात ठेवुन फोटो काढुन तो अपलोड का केलास याबाबत विचारणा केली होती. त्यावरून आरोपी घटनेच्या दिवशी माझ्या घरी आले होते. त्यांनी मला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपी निलेश याने मला थापडबुक्यांनी मारहाण सुध्दा केली. सदर घटनेचा मी माझ्या मोबाईलमध्ये रेकॉर्डिंग करीत होतो त्यावेळेस त्याचा अज्ञात मित्र म्हणजेच आरोपी क्र.२ जय डोंगरे याने माझा मोबाईल हिसकावल व मला पकडुन ठेवले. यावेळेस माझ्या दोन्ही लहान मुली अनुक्रमे ९ व ११ वर्षे

उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे माझी काकु नलु पुरन पडारे, राहणार विनोबा नगर, तुमसर ही सुध्दा उपस्थित होती. माझ्या काकुने त्या दोन्ही आरोपींना घराच्या बाहेर काढले. त्यानंतर मी पोलिस ठाण्यात घटनेबाबत फिर्याद दाखल करण्यास गेलो. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते. मी आरोपींना दाखविल्यास ओळखु शकतो. ते आज न्यायालयात हजर नाही. त्यांची आजची हजेरी निशाणी क्र. २३ प्रमोण क्षमापित करण्यात आली होती. परंतु पुरावा सुरू असतांना ते हजर झालेत. साक्षीदारांनी त्यांना ओळखले.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. गहाणे यांच्या मार्फत</u> –**

३. माझे लग्न सन २०११ मध्ये झाले होते. माझी पत्नी माझेपासुन जानेवारी २०२१ पासुन वेगळी राहत आहे. माझ्या व माझ्या घटस्फोटीत पत्नीमध्ये भंडारा न्यायालयात दोन वर्षे प्रकरण चालले.

**प्रश्न :** सन २०२१ मध्ये तुम्ही तुमच्या पत्नीसोबत भंडारा येथे वास्तव्यास होते ?

**उत्तर :** माझी पत्नी माझेसोबत ५ जानेवारी, २०२१ पर्यंतच भंडारा येथे वास्तव्यास होती.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ निलेश हा माझे पत्नीचा आतेभाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो आमच्या समाजाच्या व्यतिरिक्त व्यक्ती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पत्नीने सन २०२१ मध्ये भंडारा पोलिस स्टेशनमध्ये माझेविरूध्द तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या अनुषगाने माझे सासरे, माझा साळा व आरोपी क्र.१ पोलिस ठाणे, भंडारा येथे आले होते किंवा काय ते मला आठवत नाही.

५. जानेवारी २०२१ पासुन आम्हां पती पत्नीचा न्यायालयामार्फत घटस्फोट

होईपावेतो आमचे दरम्यान एकही सामाजीक बैठक तडजोडीच्या अनुषंगाने झाली नाही. असे काही घडले नाही की, माझी पत्नी गेल्यानंतर मी माझे सास–यांना, नातेवाईकांना व तुमसर येथील मुन्ना फुंडे यांना माझे घरी बोलविले होते. मी व माझी पत्नी दिनांक ०६.१.२०२१ पासुन विभक्त राहत आहे.

**प्रश्न :** तुमचे भंडारा येथील कोणत्या भागात, नगरात घर आहे ?

**उत्तर :** मी माझ्या व माझ्या मुलींच्या सुरक्षततेच्या दृष्टीने त्याचे उत्तर देवु इच्छित नाही.

६. माझे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे श्रीराम नगर, तुमसर येथील घरापासुन माझे काकांच्या घराचे अंतर अंदाजे २ कि.मी. आहे. साक्षदार स्वत:हुन सांगतो की, ते अंतर १ कि.मी. असावे. माझ्या तुमसर येथील घराला सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावलेले नाही. हे म्हणणे खरेआहे की, या घराच्या समोरच सिमेंट रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजुला लागुन लागुन घरे आहेत. माझ्या घराच्या समोर लिल्हारे यांचे घर आहे. त्यांचे नांव मला माहीत नाही. त्याच्या व्यतिरिक्त ईतर कोणाचे घर नाही. माझ्या घराच्या आजुबाजुला देशमुख व पराते यांचे घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्यावरून माझ्या घरी कोणी आल्यास रस्त्यावरील व्यक्तीला दिसु शकते किंवा रस्त्यावर एखादा व्यक्ती उभा असल्यास माझे घरून तो व्यक्ती दिसु शकते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्याआंगणात कोणीही जोरजोरात बोलल्यास माझ्या आजुबाजुच्या व समोरील घरातील लोकांना त्याचा आवाज जावु शकतो.

७. असे काही घडले नाही की, मी पोलिसात तक्रार दाखल करण्यासाठी गेलो असता माझी पोलिसांकडुन वैद्यकिय तपासणी करून घेण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मी नोकरीवर लागण्या अगोदर पत्रकार म्हणुन देखील काम केले आहे. एखाद्याला मारहाण झाल्यास पोलिस त्याची वैद्यकिय तपासणी करून घेत असतात किंवा नाही याची मला माहिती नाही. पोलिसांनी मला वैद्यकिय तपासणी करून घेण्याकामी विचारणा केली होती. मी वैद्यकिय तपासणीस गेलो नाही.

८.	पुरन मंगरू पडारे हे माझे सख्खे काका आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शिवपाल सिंग ठाकुर हे माझे काकांचे घराशेजारी विनोबा नगर येथे राहतात. ते त्यांचे चांगले मित्र आहेत किंवा काय हे मला माहीत नाही.

९.	तक्रार निशाणी क्र. २५ ही मीच स्वत: लिहीली होती. त्यामध्ये आरोपीने घटनेअगोदर माझ्या पत्नीच्या खांद्यावर हात ठेवुन काढलेला फोटा अपलोड केला होता व त्याबाबत मी त्यास विचारणा केल्यामुळे तो घटनेच्या दिवशी माझ्या घरी आला होता, ही बाब नमुद नाही. जोगेंद्र श्रीकृष्ण घटारे हा माझा नात्यावे साळा लागत होता. योगेश मधुकर घटारे हा माझ्या पत्नीचा भाचा होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचेविरूध्द मी काही वर्षांपुर्वी तक्रार दाखल केली होती. साक्षदार स्वत:हुन सांगतो की, त्यांनी मारहाण केली होती म्हणुन तक्रार दाखल केली होती. लग्नाच्या नंतर मी पत्नीच्या नातेवाईकांविरूध्द किती वेळा तक्रार दाखल केल्या हे मला आठवत नाही. कथीत तक्रारीच्या अगोदर आरोपींशी माझे व्यक्तीगत वैर नव्हते.

१०.	हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोरील रस्त्याने सकाळ पासुन ते रात्रीपर्यंत लोकांचे येणे जाणे असते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या आजुबाजुला असलेल्या घरांमध्ये केवळ कम्पाऊंड वॉलचे अंतर आहे. माझ्या घरापासुन त्यांच्या दरवाज्याचे अंतर अंदाजे ६० फुट असावे. त्यांच्या आंगणाचे व माझ्या घराच्या कम्पाऊंडचे अंतर किता असेल ते मला सांगता येणार नाही. आमची घरे एकाच ले–आऊट मध्ये बांधलेली आहेत किंवा काय हे मला सांगता येणार नाही. असे काही घडले नाही की, कथीत प्रकरणासंबंधी मी पोलिसांना माझा मोबाईल दिला किंवा त्यांनी माझा मोबाईल मागितला होता.

११.	हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला चापटबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. २ने माझ्या हातातील मोबाईल हिसकावुन घेतला हे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या काकुने त्या दोघांनाही घराबाहेर काढले हे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा माझे पत्नीचा नातेवाईक असल्याने व तो तिला

मदत करीत असल्यामुळे सुळ भावनेने मी प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. २४.११.२०२५ | दि.२४.११.२०२५ |